**प्रसिध्दी पत्रक** दिनांक 06/04/2026

**आलोसे** - 1. डॉ विजय बजरंग दळवी , वैद्यकीय अधीक्षक (वर्ग-1) , ग्रामीण रुग्णालय बिडकीन , ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर
2) नारायण हरिश्चंद्र ब्राह्मणे कंत्राती नोकरी , सफाई कर्मचारी , ग्रामीण रुग्णालय बिडकीन , ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार यांचेकडुन 1200/- रुपये लाच स्विकारल्याने आलोसे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पोलीस ठाणे बिडकीन छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| आलोसे यांचे नाव व पत्ता | 1. डॉ विजय बजरंग दळवी , वय 58 वर्ष, व्यवसाय -नोकरी -वैद्यकीय अधीक्षक (वर्ग-1) , ग्रामीण रुग्णालय बिडकीन , ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर , रा. ए - 3 , विनस अपार्टमेंट बीड बायपास , छत्रपती संभाजीनगर.<br>2) नारायण हरिश्चंद्र ब्राह्मणे वय 37 वर्ष व्यवसाय कंत्राती नोकरी , सफाई कर्मचारी , ग्रामीण रुग्णालय बिडकीन , ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर,रा. नवीन गावठाण बिडकीन, कृष्णापूर ता पैठण जि. छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागणी रक्कम | 6,000/- (सहा हजार रुपये ) |
| लाच स्विकृती रक्कम | 1,200/- (बाराशे रुपये ) |
| सापळा अधिकारी<br>तपास अधिकारी | श्री.योगेश शिंदे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर.<br>श्री.संतोष तिगोटे, पोलिस निरीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांच्या बहिणीचे शासकीय योजनेतून कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यासाठी |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार यांचे तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 06/04/2026 रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली असता, यातील आलोसे क्रमांक 1) डॉ दळवी यांनी तक्रारदार यांचे बहिणीची ग्रामीण रुग्णालय बिडकीन येथे शस्त्रक्रिया करून देण्यासाठी 1200/- रुपये पंचासमक्ष लाच मागणी करून, सदर लाचरक्कम स्वीकारण्याचे कबूल करून लाचरक्कम त्यांचे दवाखान्यातील सफाई कामगार आरोपी क्र.2 नारायण ब्राह्मणे, याचेकडे आणून देण्यास सांगितले.<br>लाच मागणी नंतर दिनांक 06/04/2026 रोजी शासकीय पंच समक्ष सापळा कारवाई आजमावली असता नारायण ब्राह्मणे, सफाई कर्मचारी, ग्रामीण रुग्णालय बिडकीन याने लाचेची 1200/- रुपये स्वीकारली असता त्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर डॉ दळवी यांचा शोध घेऊन त्यांना देखील ताब्यात घेण्यात आले.<br>आलोसे यांचे राहते घराची घरझडती घेण्याची प्रक्रीया सुरु आहे तसेच आलोसे यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन बिडकीन येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. सदर सापळा कारवाई ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर यांनी केली असुन पुढील तपास ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर घटक करणार आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे, अपर पोलीस अधीक्षक श्री.शशिकांत सिंगारे, पोलीस उप अधीक्षक श्री राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरिक्षक श्री योगेश शिंदे यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पोह/ दिपक इंगळे, पोह/युवराज हिवाळे, पो.अंम.रामेश्वर ताठे, ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर यांनी मदत केली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर
ई- मेल :-1)spacbaurangabad@mahapolice.gov.in 2) dysp.acbcsn@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 90110 92777 अपर पोलीस अधीक्षक :- 9923102205
पोलीस उप अधीक्षक :- 9823498777 व्हॉट्सअप क्रमांक :- 7720891064


सही/-

सही/- ( **राजीव तळेकर** )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.